**प्रेस नोट** **दिनांक २७/०३/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**फरासखाना पोलीस स्टेशनकडील पोलीसांनी निराधार मुलांसोबत साजरी केली रंगपंचमी**

दि.२५/०३/२०१९ रोजीफरासखाना पोलीस स्टेशन व महाराष्ट्र गणेश मंडळ यांचे संयुक्त विद्यमानाने बुधवार पेठेतील सेक्स वर्करच्या लहान मुलांसोबत रंगपंचमी साजरी केली. बुधवार पेठेमध्ये सेक्स वर्कर यांची लहान मुले आहेत. ते स्व-आधार केंद्रात असतात. ब-याच मुलांना आई-वडीलांचा आधार नाही. आशा मुलाच्या चेह-यावर हसु फुलावे या उद्देशाने फरासखाना पोलीस स्टेशनचे वतीने बुधवार पेठेत अनाथ मुलांसोबत रंगपंचमी साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे वेळी स्थानिक नागरीक व सामाजीक संस्थानी सहभाग घेतला.

सदर कार्यक्रमाकरीता डॉ.मिलींद भोई, महाराष्ट्र गणेश मंडळाचे कार्यकर्ते, तसेच फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,किशोर नावंदे व इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे्